ePaper

## राज ठाकरेंना स्मृतिभ्रंश झालाय: जितेंद्र आव्हाड



वर्ष - 7 । अंक -12 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । सोमवार, दि. 8 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- मुंबई-पुणे महामर्गावर भयंकर प्रकार!
- पुणेकरांनो, मुलांना सांभाळा!
- बाणेर-बालेवाडी लवकरच 'टँकरमुक्त'!


# कर्नाटकात एकहाती सत्ता निश्चित!

## चंद्रशेखर बावनकुळे : भाजपाचा कार्यकर्ता संवाद मेळावा

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकमध्ये भाजपची एकहाती सत्ता येईल असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. भाजपच्या विजयाने विरोधक हतबल होतील असा टोला देखील त्यांनी विरोधकांना लागवला आहे. तसेच, पिंपरी- चिंचवड शहरासह राज्यातील ७५ जिल्ह्याध्यक्ष बदलण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.**





पिंपरी- चिंचवडमध्ये जिल्हा भाजपकडून बूथ आणि पदाधिकारी बैठक आयोजित केली होती. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पिंपरी- चिंचवडमध्ये जिल्हा भाजपकडून बूथ आणि शक्ती प्रमुख केंद्र तसेच पदाधिकारी बैठक आयोजित केली होती. १ लाख घरी प्रवास करण्याची योजना तयार केली. प्रत्येक विधानसभेत साठ हजार घरी प्रवास करणार आहोत. २० मे पर्यंत हा प्रवास पूर्ण होणार आहे. प्रत्येक बूथवर २५ पक्ष प्रवेश होतील अशी योजना आखली आहे. पुढे ते म्हणाले, कर्नाटक निवडणुकीत भाजपचा विजयी नक्की होईल. विरोधक हतबल झालेली दिसतील. मोदींच्या नेतृत्वाखाली कर्नाटकमध्ये बहुमताने आमचे सरकार येईल. पुढे ते म्हणाले, पिंपरी- चिंचवडसह राज्यातील ७५ जिल्ह्याध्यक्षांची निवड प्रक्रिया सुरू झाली. आमचे पदाधिकारी त्यावर चर्चा करणार असून त्याचा अहवाल लवकरच सादर करणार आहोत.

### शरद पवार म्हणतात काँग्रेस सत्ता मिळवणार...


**दरम्यान, कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस विजयी होईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. शरद पवार म्हणाले, "दिल्ली, पंजाब, उत्तराखंड, बंगालमध्ये भाजपाची सत्ता नाही. देशाचा नकाशा पाहिल्यास लक्षात येईल की, अनेक राज्यात भाजपा सत्तेवर नाही. इतर राज्यात नॉन भाजपा सरकार आहे. त्याचबरोबर आता कर्नाटकमधील स्थानिक लोक भाजपावर नाराज आहेत, त्यामुळे कर्नाटकमध्ये काँग्रेसची सत्ता येणार असं दिसतंय."**

# 'द केरला स्टोरी' चित्रपट महाराष्ट्रात करमुक्त करा !

## आमदार महेश लांडगे : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणी

। पिंपरी। महाईन्यूज ।

**शात 'लव्ह जिहाद'अंतर्गत हिंदू व ख्रिश्चन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून अत्याचाराला बळी पडणाऱ्या मुलींच्या जीवनावर आधारित सत्य 'द केरल स्टोरी' हा चित्रपट आहे. तो संपूर्ण महाराष्ट्रात करमुक्त करावा, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**




याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणीचे पत्र पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, भारतात 'लव जिहाद' ला बळी पडलेल्या हिंदू व ख्रिश्चन मुलींचे वास्तव चित्रण करणारा 'द केरला स्टोरी' हा मध्यप्रदेश सरकारने करमुक्त केला आहे. या सिनेमामधील हिंदू समाजावरील मुलींवर जिहादी मानसिकता असणाऱ्या लोकांनी अनन्वित अत्याचार करून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांची फसवणूक करून आयुष्यातून कशा पद्धतीने उध्वस्त केले जाते, याचे योग्य आणि खरे चित्रीकरण केले आहे.

'द केरला स्टोरी' या हिंदी चित्रपटामुळे लव्ह जिहादचे वास्तव खऱ्या अर्थाने उजेडात आले आहे. हा चित्रपट जास्तीत जास्त हिंदू बांधवांपर्यंत पोहोचवा. सदर चित्रपट प्रत्येकाने पहावा हा हेतू लक्षात घेऊन राज्य सरकारने या चित्रपटाला करमुक्त करावे, अशी आग्रही मागणी सर्व हिंदू समाज बांधवांच्या वतीने करीत आहोत.

### महायुतीच्या काळात 'लव्ह जिहाद'ला आळा बसावा : आमदार लांडगे

**'द केरला स्टोरी' हा चित्रपट महाराष्ट्रातील जनतेने अधिकाधिक पाहता यावा. याकरिता हा चित्रपट लवकरात लवकर करमुक्त करावा, अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील जिल्ह्याजिल्ह्यात 'लव्ह जिहाद'च्या घटना समोर येतात. याविरोधात राज्यभरामध्ये ठिकठिकाणी हिंदूत्ववादी संघटना, संस्थांनी मोर्चे, आंदोलने केली आहेत. तसेच, राज्यात लव्ह जिहाद कायदा व्हावा यासाठी विधिमंडळ अधिवेशनात देखील हा मुद्दा मांडण्यात आला होता. आपल्या सरकारच्या काळात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली 'लव्ह जिहाद'ला आळा बसेल आणि पीडित हिंदू मुलींना न्याय मिळावा, अशी अपेक्षाही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**

# मुंबई-पुणे महामर्गावर भयंकर प्रकार!

## सावधान! पोलिसांची मोठी कारवाई; 3 जणांना अटक

। पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तुम्ही जर मुंबई - पुणे महामार्गावरून प्रवास करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. कारण, इथे ३ जणांच्या टोळीला पोलिसांनी अटक केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे तुम्हीही जर या मार्गावरून प्रवास करत असाल तर सावधान राहा, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.**



मुंबई - पुणे महामार्गावर प्रवास करणाऱ्यांसाठी ही बातमी महत्त्वाची आहे. जबरी चोरी करणाऱ्या ३ जणांच्या टोळीला खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. गाड्या अडवून हे तिघेजण नागरिकांना लुबाडायचे. धमकी देऊन त्यांच्याकडील रक्कम काढून घेत त्यांना दमदाटी करायचे. याबाबत पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या खंडणी विरोधी पथकाने पाठलाग करून त्यांना पकडले आहे.

अभिषेक लक्ष्मण भोसले (वय २० वर्षे रा. निर्मल बैतानी शाळेसमोर, विजयनगर, काळेवाडी, पुणे., विजय सिध्दार्थ म्हस्के वय २० वर्षे रा. शिंदे यांचे खोलीत, आझाद कॉलनी नं. ३. पाचपीर चौक, काळेवाडी, पुणे, शांतकुमार चंद्रशेखर ददुल वय २० वर्षे रा. पाडाळे यांचे खोलीत क्रांती चौक, विजयनगर, काळेवाडी, पुणे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार खंडणी विरोधी पथकातील स्टाफ खाजगी वाहनाने पुणे- मुंबई महामार्गावर पेट्रोलींग करत असताना एका ग्रे रंगाची नंबरप्लेट नसलेली ॲक्टीव्हा मोपेड गाडीवरुन ट्रिपल सीट जाताना दिसल्याने त्यांना थांबण्याचा इशारा केला.

मात्र ते न थांबता जावू लागल्याने त्यांचा संशय आला. त्यावेळी पोलिसांनी त्यांना पाठलाग

### तर ही प्रवाशांसाठीही दिलासादायक बातमी

**» यावेळी त्यांची तपासणी केली असता गुन्ह्यातील चोरीस गेलेला लॅपटॉप, गुन्ह्यात वापरलेली ॲक्टीव्हा मोपेड, एक लोखंडी कोयता व ०२ मोबाईल फोन असा एकुण ९५,२००/-रू किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांना पुढील कार्यवाहीसाठी देहूरोड पोलीस ठाणे येथे हजर केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास देहूरोड पोलीस स्टेशन करीत आहेत. दरम्यान, या टोळीला पकडल्याने संपूर्ण टोळीला पकडण्यात पोलिसांनी मदत होईल तर ही प्रवाशांसाठीही दिलासादायक बातमी आहे.**

# पुणेकरांनो, मुलांना सांभाळा!

## आलीय कांजिण्याची साथ, जाणून घ्या लक्षणं अन् घ्यावयाची काळजी

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे लहान मुलांना कांजिण्याचा संसर्ग होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर मुलांना डोळ्यांचा दाह होण्याचाही त्रास होत आहे. हा त्रास टाळण्यासाठी वेळीच लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन बालरोगतज्ज्ञांनी केले आहे.**



गेल्या काही दिवसांपासून शहरात कधी पाऊस, तर कधी ऊन असे वातावरण आहे. त्यामुळे लहान मुलांमध्ये आरोग्याच्या समस्या वाढल्याचे दिसून येत आहे. कांजिण्या हा संसर्गजन्य आजार असून, दर वर्षी उन्हाळा सुरू झाला की लहान मुलांना याचा त्रास होतो. संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या नाकातून आणि तोंडातून सूक्ष्म थेंबांच्याद्वारे हा विषाणू पसरतो. कांजिण्याचा संसर्ग झाल्यावर सुरुवातीला लक्षणे दिसून येत नाहीत. त्यानंतर ताप, डोकेदुखी, अंगदुखी व थकवा अशी लक्षणे दिसतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवसानंतर ताप वाढतो, चेहऱ्यावर, छातीवर व मानेवर लाल फोड येतात. तिसऱ्या दिवसानंतर हे फोड शरीरावर पसरतात. कांजिण्यांपासून सरंक्षण मिळण्यासाठी लसीकरण करून घेणे आवश्यक असल्याचे बालरोगतज्ज्ञांनी सांगितले.

### अन्य आजारांची शक्यता

**» लहान मुलांची रोगप्रतिकारक्षमता कमी असल्याने त्यांना कांजिण्या होण्याची शक्यता जास्त असते. रोगप्रतिकारक्षमता कमी असल्याने अन्य आजार होण्याची शक्यतादेखील असते. त्यामुळे मुलांची रोगप्रतिकारक्षमता वाढवी, आजारांना प्रतिबंध व्हावा यासाठी मुलांचे नियमित लसीकरण करण्यात येत असते. मात्र, करोनामुळे गेल्या दोन वर्षांत लहान मुलांच्या लसीकरणात अडथळा निर्माण झाला होता. परिणामी लहान मुलांमध्ये गोवर आणि अन्य आजारांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले होते. यंदा पून्हा सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये मुलांचे लसीकरण सुरू झाले आहे**

### कांजिण्या झाल्यावर काय काळजी घ्यावी?


- » शरीर, त्वचा स्वच्छ ठेवावी.
- » घर स्वच्छ ठेवावे.
- » सहज पचेल असे अन्न घ्यावे.
- » संसर्ग झालेल्या व्यक्तीपासून दूर राहावे.
- » मुलांचे नियमीत लसीकरण करून घ्यावे.

**“ कांजिण्याचा संसर्ग झाल्यास त्वरीत उपचार घेणे आवश्यक असते. कारण योग्य उपचार न घेतल्यास यातून न्यूमोनिया आणि त्वचारोग होण्याची शक्यता असते. काही वेळा मेंदूचे आजार होण्याची शक्यता देखील असते.**

**- डॉ. प्रदीप सूर्यवंशी, बालरोग व नवजात शिशूतज्ज्ञ**

# आरटीई प्रवेश प्रक्रियेत पालकांचा निरुत्साह!

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।




शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रवेश निश्चित करण्यात पालकांचा निरुत्साह असल्याचे दिसून येत आहे. प्रवेशासाठी ९४ हजार ७०० जागा उपलब्ध असताना आतापर्यंत केवळ ४८ हजार विद्यार्थ्यांचेच प्रवेश निश्चित झाल्याचे दिसून येत असून, प्रवेशासाठी सोमवार (८ मे) अंतिम मुदत आहे. खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रवेश निश्चित करण्यात पालकांचा निरुत्साह असल्याचे दिसून येत आहे.

राज्यात प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ८ हजार ८२३ शाळांमध्ये १ लाख १ हजार ८४६ प्रवेशाच्या जागा उपलब्ध झाल्या. या जागांसाठी ३ लाख ६४ हजार ४१३ बालकांच्या पालकांनी अर्ज केले. प्रवेशासाठीच्या सोडतीनंतर ९४ हजार ७०० विद्यार्थ्यांची निवडयादी जाहीर करण्यात आली. त्यानंतर निवड यादीतील मुलांच्या पालकांनी १३ एप्रिलपासून पडताळणी समितीकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून शाळांमध्ये प्रवेश निश्चित करण्यास सुरवात झाली. सुरवातीला आरटीईच्या संकेतस्थळाला तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या. मात्र त्यानंतर संकेतस्थळ सुरळीत सुरू झाले. सुरवातीला प्रवेश निश्चित करण्यासाठी २५ एप्रिलची मुदत देण्यात आली होती. त्या मुदतीत प्रवेश न झाल्याने मुदतवाढीचा निर्णय घेऊन ८ मेपर्यंत मुदत वाढवण्यात आली. मात्र प्रवेशाची मुदत संपण्यास एक दिवस बाकी असतानाची जेमतेम निम्मेच प्रवेश झाल्याचे आरटीई संकेतस्थळावरील आकडेवारीवरून दिसून येत आहे. निवड यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

# बाणेर-बालेवाडी लवकरच 'टँकरमुक्त'!

## ट्रान्समिशन लाइन' काम प्रगतीपथावर : मेअखेरीस पाणी समस्या सुटणार!

। पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत पँन सिटीचा भाग म्हणून निवड करण्यात आलेल्या बाणेर-बालेवाडीसाठी महापालिकेकडून यंदाच्या उन्हाळ्यात मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वारजे जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाणी पुरवठा करण्यासाठी सुमारे 23 किलोमीटरची ट्रान्समिशन लाइन टाकण्याचे तब्बल 22.500 किलोमीटर जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. पुढील 10 दिवसांत उर्वरीत 500 मीटरचे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यामुळे, या भागातील तब्बल 5 ते 7 लाख नागरिकांना टँकरपासून मुक्ती मिळणार आहे.



चांदणी चौक, डुक्कर खिंड आणि सूस खिंडीच्या जवळ हे काम शिल्लक असल्याचे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख अनिरूद्ध पावसकर यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात बालेवाडी तर त्यानंतर पुढील आठवडाभरात बाणेर भागाची समस्या सुटणार आहे. बाणेर-बालेवाडी गावांतील पाण्यासाठी तब्बल 23 किलोमीटरच्या महत्वाच्या जलवाहीन्या टाकण्याचे काम 98 टक्के पूर्ण झाले आहे. अनेक ठिकाणी महामार्गात हे काम असल्याने तसेच काही भागात नदी ओलांडून काम करायचे असल्याने अनेक अडचणी होत्या. मात्र, हे काम अखेर पूर्ण झाले असून मेअखेरीस या भागातील पाणी समस्या सुटलेली असेल.

### पाण्याचा उलटा प्रवास थांबणार...

बाणेर-बालेवाडी भागाला पाणी पुरवठा करण्यासाठी यापूर्वी महापालिका वारजे जलकेंद्रातून चांदणी चौकातील टाकीत पाणी सोडत होती. तेथून हे पाणी पाषाण टाकीला जात होते. त्यानंतर पाषाण येथून हे पाणी सूस पाण्याच्या टाकीवर जाऊन नंतर पॅनकार्ड क्लब (बालेवाडी) व पाच लाख लिटरच्या टाकीत जायचे, त्यानंतर या पाण्याचे वितरण व्हायचे. मात्र, आता पालिकेने चांदणी चौकातच ब्रेक प्रेशर टँक उभारला असून या ठिकाणाहून पाणी आता थेट पुणे-बेंगलोर महामार्गाच्या बाजूने गुरूत्वाकर्षनाद्वारे बाणेर-बालेवाडीत उभारण्यात आलेल्या तीन टाक्यांमध्ये जाईल. या टक्यांची क्षमता तब्बल 1 कोटी 15 लाख लीटर आहे. यातून बाणेर-बालेवाडीसाठीचा पाण्याचा उलटा प्रवास थांबणार आहे.

"या भागातील पाण्यासाठी मी स्वत: न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून सातत्याने पाण्याच्या टाक्या, महामार्गाच्या बाजूने जलवाहिनीसाठी पाठपुरावा केला. त्यामुळे, या भागातील नागरिकांची गेल्या अनेक वर्षांची पाण्याची समस्या कायमची संपणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून याचे समाधान आहे," असे माजी नगरसेवक अमोल बालवडकर म्हणाले.

# डॉ. अमोल कोल्हे यांच्याशी दिलखुलास गप्पा

## दिशा सोशल फाऊंडेशनचा उपक्रम : एच. ए. मैदानावर 'शिवपुत्र संभाजी' महानाट्य

।पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी: दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने मंगळवारी (दि.९ मे) चिंचवड येथे डॉ. अमोल कोल्हे यांच्याशी दिलखुलास गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड शहरात मध्यवर्ती असलेल्या एच. एच. कंपनीच्या मैदानावर गुरुवार दि. ११ मे पासून मंगळवार दि. १६ मे पर्यंत शिवपुत्र संभाजी या महानाट्याचे सलग सहा दिवस, सहा प्रयोग होणार आहेत. या महानाट्याचे औचित्य साधून डॉ. कोल्हे यांची मुलाखत दिशा सोशल फाऊंडेशन चे अध्यक्ष नाना शिवले घेणार आहेत.






हा मुलाखतीचा कार्यक्रम विनामूल्य असणार आहे. प्रेक्षकांनी नियोजित वेळेपूर्वी १० मिनिटे आसनस्थ व्हावे. प्रवेशासाठी प्रथम येईल, त्यास प्राधान्य, काही जागा मान्यवरांसाठी राखीव आहेत, अशी माहिती संस्थेचे माजी अध्यक्ष गोरख भालेकर व माजी कार्याध्यक्ष सचिन साठे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्याहस्ते सत्कार... चिंचवड, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मंगळवारी (दि.९) सायंकाळी ५:३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात शंभूराजांचा जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शहराचे प्रथम महापौर व हवेलीचे माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते डॉ. कोल्हे यांचा सत्कार होणार आहे. या समारंभात ब. हि. चिंचवडे. श्रमिक गोजमगुंडे, संजय पाचपुते, प्रद्योत पेंढारकर, दिनेश ठोंबरे, आयुष तापकीर यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# राहत्या घरातून दोन लहान मुले बेपत्ता

।पिंपरी चिंचवड। महाईन्यूज ।



दोन्ही मुलांना घरी ठेऊन वडील कामावर गेले असता दोन्ही मुले बेपत्ता झाली. हा प्रकार वडील सायंकाळी घरी आल्यावर उघडकीस आला.

निखील वर्मा (वय 8), नितीन वर्मा (वय 6) अशी बेपत्ता मुलांची नावे आहेत. याप्रकरणी लक्ष्मी राजकुमार वर्मा (वय 30, रा. विठ्ठलवाडी, देहूगाव) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे पती राजकुमार शनिवारी (दि. 6) सकाळी नऊ वाजता कामावर गेले. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले निखील आणि नितीन हे घरी होते. (DEHUGAON) फिर्यादी आणि त्याचे पती सायंकाळी सहा वाजता घरी आले असता त्यांची दोन्ही मुले घरी आढळली नाहीत.

त्यांनी देहूगाव परिसरात बस थांबा, मंदिर, नातेवाईक यांच्याकडे चौकशी केली. मात्र मुले कुठेच आढळली नाहीत. निखील वर्मा याची उंची 4.5 फूट, बांधा पातळ रंग गोरा, केस बारीक काळे, अंगात नेसणीस पिवळ्या रंगाचे चौकडी शर्ट, त्यावर जॉय नेस्ट शाळेचा बॅच, निळ्या रंगाची फुल पँट, पायात लाल रंगाची चप्पल घातलेली आहे.

नितीन वर्मा याची उंची 4 फूट, बांधा पातळ, रंग गोरा, केस बारीक, अंगात नेसणीस सफेद रंगाचा टी शर्ट, काळ्या रंगाची हाफ पँट, पायात निळ्या रंगाची चप्पल घातलेली आहे. (DEHUGAON) वरील वर्णनाची मुले आढळून आल्यास देहूरोड पोलिसांशी (02027671188, 9823586190, 9422939077) संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बारसू, हसू आणि आसू






बारसू तेलशुद्धीकरण प्रकल्पाला होणारा विरोध कोकणाच्या फायद्याचा आहे का? बारसू रिफायनरीवरुन वातावरण तापलं असून आंदोलक अन् पोलिसांमध्ये जोरदार राडादेखील झाल्याची घटना घडली. जाणून घ्या नेमकं काय आहे हे बारसू रिफायनरी प्रकरण...

कोकण आणि कोणताही मोठा प्रकल्प यांचे नाते सातत्याने विळ्याभोपळ्याचे राहत आले आहे. एकही प्रकल्प विरोधाविना उभा राहत नाही आणि 'एनरॉन'सारखा प्रकल्प प्रचंड विरोधानंतर उभा राहतो, त्याचाही शेवटी कोकणाला फायदा होतच नाही. आता बारसू तेलशुद्धीकरण प्रकल्पाला होणारा विरोध कोकणाच्या फायद्याचा आहे का, याचा निष्पक्ष, गंभीर आणि शास्त्रीय विचार व्हायला हवा. आधी हा प्रकल्प रत्नागिरी जिल्ह्यातीलच नाणार येथे होणार होता. तो मागील शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या सरकारने रद्द केला. तेव्हा हा जगातला सगळ्यांत मोठा तेलशुद्धीकरण प्रस्तावित प्रकल्प होता. नंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीच्या सरकारने हा प्रकल्प नाणारपासून जवळच्या बारसू येथे हलविला. आता त्यालाही तीव्र विरोध होत आहे.

केंद्र सरकारने वारंवार विचारणा केल्याने आपण बारसू येथे प्रकल्पाची सूचना केली, असे आता उद्धव ठाकरे सांगत आहेत. ही त्यांची भूमिका पटणारी नाही. आता ते 'स्थानिकांची जी भूमिका, तीच आमची भूमिका' असे म्हणत असतील, तर हीच भूमिका त्यांनी केंद्र सरकारला पत्र पाठविताना घ्यायला हवी होती. 'माझ्या राज्यातले नागरिक विरोधात आहेत. सबब, आम्हाला हा प्रकल्पच नको,' असे केंद्र सरकारला सांगता आले असते. तसे ते सांगितले होते का? कोकणातले आंदोलक आणि रहिवासी सातत्याने सगळ्या प्रकल्पांच्या विरोधात का जातात आणि असे करण्यात त्यांना त्यांच्या पुढच्या पिढ्यांचे हित वाटते का, हाही प्रश्न या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. त्याचाही कधी तरी निकाल लागावा.

आपण विकासाचे वेगळे प्रारूप १९९१मध्ये स्वीकारले. ते चालविणारी सरकारे आपण निवडून देतो. आपल्या इंधन, विजेसहित सर्व गरजा दिवसेंदिवस वाढत आहेत. आपल्याला मुबलक प्लास्टिक वापरायचे आहे. वाहने हाकायची आहेत. विमानांनी फिरायचे आहे. मग हे सगळे करण्यासाठी लागणारे इंधन शुद्ध कुठे होणार? जी वीज लागणार, ती निर्माण कशी होणार? म्हणजे, सगळ्या आधुनिक गोष्टींचा उपभोग घ्यायचा आणि प्रकल्प मात्र करू नका, असे म्हणायचे, हा निव्वळ दुटप्पीपणा झाला. विशेषत: महाराष्ट्रात हा दुटप्पीपणा गेली अनेक दशके चालू आहे. त्याला विविध कारणांनी जागतिक प्रतिष्ठाही मिळाली. सौदी अरेबियाच्या ज्या 'अरामको' कंपनीला येथील तेलशुद्धीकरण प्रकल्पात येण्यास विरोध होतो आहे, त्या कंपनीने काही दिवसांपूर्वीच चीनशी करार केला. चिनी प्रकल्पांमध्ये भागीदारी घेतली. आपण प्रकल्पांना विरोध करीत राहिलो, तर ते केवळ इतर राज्यांत जातील, असे नाही. ते इतर देशांतही जातील. करोनानंतर भारत नव्या गुंतवणुकीत चीनला अनेक कारणांनी मागे टाकेल, असे म्हटले जात होते. तसे झालेले नाही. भारतात नवे उद्योग उभे करणे किती कटकटीचे असते, हे जगातल्या कंपन्यांनाही कळतेच. ते त्यांना नको असते. जैतापूरचा अणुप्रकल्प निर्धोक आहे, त्याच्यामुळे सागरी तापमानात वाढ होणार नाही, मासेमारी संपणार नाही, असे वैज्ञानिकांनी सांगूनही ते आजही न पटणारे आहेतच. आता जैतापूर आणि बारसू यांच्यात पुरेसे अंतर नाही, हा नवीनच मुद्दा पुढे आला आहे. हे अंतर पुरेसे आहे किंवा नाही, याचा निर्णय वैज्ञानिकांवर सोपवावा. समजा, उद्या एखाद्या ज्येष्ठ अणुवैज्ञानिकाला हे भौगोलिक अंतर पुरेसे वाटत असेल, तर आपण त्यांचे ऐकणार की नाही?

एकंदर जागतिक स्थिती पाहता, तेलाबाबत कायमचे पराधीन राहणे भारताला परवडणारे नाही. नाणार किंवा बारसूमुळे ही पराधीनता कमी होणार होती. आखाती देशांमध्ये आजवर अमेरिका, अनेक युरोपीय देशांनी आपले मजबूत स्थान निर्माण केले. अमाप पैसा गुंतविला. आज चीन तेच करीत आहे. मग आपण यात मागे राहायचे का? यावर 'प्रकल्प करा; पण आमच्याकडे नको,' असे म्हणता येते. काही आंदोलक आंबा, मासेमारी किंवा इतर रासायनिक प्रकल्पांची अयोग्य निगा यांकडे बोट दाखवून हेच म्हणत आहेत. या शंकाही तज्ज्ञच दूर करू शकतात. गुजरातमधल्या अंबानी यांच्या जामनगर रिफायनरीजवळच्या आंब्यांच्या बागांचे उदाहरण आता जुने झाले, तरीही सगळ्या शंका दूर करण्याचा मार्ग तज्ज्ञांशी चर्चा व त्यांच्यावर विश्वास हाच आहे. मात्र, हे तेवढ्यापुरते नाहीच. महाराष्ट्रातल्या सगळ्या पक्षांना कोकण आणि कोकणी माणसाची ढाल करून प्रकल्पांचे यथेच्छ राजकारण करायचे आहे. ते महाराष्ट्राच्या हिताच्या मुळावर उठणारे आहे. विरोधात असले की एक भूमिका आणि सत्तेत आले की वेगळी, हे 'एनरॉन'पासून चालत आले आहे. आता तरी हे बालीश आणि ऱ्हस्वदृष्टीचे राजकारण राजकीय पक्षांनी थांबवावे. मोजके पुंजके सोडले, तर बहुतांश महाराष्ट्र आजही विकासात अर्धपोटीच आहे.

## संपादकीय »

### सावधगिरीचा इशारा


***भारताचा चालू आर्थिक वर्षीतील 'जीडीपी', म्हणजे एकूण देशांतर्गत उत्पादनातील वाढ साडेसहा टक्के तरी होईल का, ही या आढाव्यातली मुख्य शंका आहे.***

जगावरचे करोनाचे सावट दूर झाले असले आणि चालू आर्थिक वर्षात साऱ्या जगात भारताचा विकास दर सर्वाधिक राहण्याची शक्यता असली, तरी साऱ्या चिंता मिटलेल्या नाहीत; किंबहुना हे आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी जे आकांक्षांचे धुमारे फुटले होते, ते वर्षभर तसेच राहतील का, अशी शंका आहे. या काळजीची देशांतर्गत; तसेच बाह्य कारणेही आहेत.

या काळजीचे प्रतिबिंब नुकत्याच प्रकाशित झालेल्या केंद्रीय अर्थ खात्याच्या मासिक आढाव्यात पडले आहे.भारताची अर्थव्यवस्था कितीही प्रगत आणि मोठी झाली, तरी तिचा कृषी व शेतीवरील आधारित इतर आनुषंगिक क्षेत्रांशी असणारा जैविक संबंध कधीही तुटणारा नाही. भारतात मागणीचे चक्र वेगाने फिरते, तेव्हा मोसमीचा पाऊस चांगला झालेला असतो. पाऊस व्यवस्थित झाला नाही, तर यंदा मोठा फटका बसू शकतो.

**यंदाचा मोसमी पाऊस समाधानकारक असेल किंवा नाही, याविषयी वेगवेगळे अंदाज व्यक्त होत आहेत. सरकारी वेधशाळा यंदाही नेहेमीप्रमाणेच पाऊस होईल, असे सांगत आहेत. मात्र, काही खासगी संस्थांच्या अंदाजात यंदा पाऊस नेहेमीपेक्षा कमी असेल, असे म्हटले आहे.**

## पाण्यासाठी वणवण का?



एका बाजूला वर्षातल्या कोणत्याही महिन्यात पाऊस पडत आहे. पिकांचे नुकसान होते आहे. दुसरीकडे, शहरांना पाणी पुरविणाऱ्या धरणांमधील जलसाठे झपाट्याने कमी होत आहेत. मुंबई शहरासहित महामुंबई परिसरातील सर्वच शहरे वाढत्या पाणी टंचाईला सामोरी जात आहेत. बहुतेक ठिकाणी आधीच पाणीकपात सुरू झाली आहे. कल्याण आणि डोंबिवली या दोन मोठ्या शहरांमध्ये १५ टक्के पाणीकपात सुरू झालीच आहे. याशिवाय, बहुतेक भागांमध्ये आठवड्यात एक दिवस पाणी बंद राहणार आहे. हा सगळाच परिसर एरवीही पाण्याबाबत समाधानी नाही. हजारो घरांना पुरेसे पाणी वर्षभरात कधीही मिळत नाही. आता तर अधिकृतपणेच कपात सुरू झाली आहे. स्वत:चे धरण असणारी महापालिका म्हणून नवी मुंबई महापालिकेचे कौतुक केले जाते. ते खरेही आहे. राज्य सरकारने दिलेल्या निर्देशानुसार नवी मुंबईतही काही दिवसांपूर्वीच पाणीकपात लागू झाली आहे. याशिवाय, विभागवार आठवड्यातून एक दिवस सायंकाळी पाणी मिळणार नाही. ही कपात पावसाळा सुरू होईपर्यंत राहणार आहेच; पण पावसाने ओढ दिली तर या काय होणार, हा प्रश्न आहेच.

महामुंबईतील झपाट्याने विकास होणारा वसई आणि विरारचा परिसर पाहिला तर ज्या वेगाने नव्या इमारती आणि वसाहती झाल्या, त्या वेगाने पाणी मात्र मिळत नव्हते. आजही मिळत नाही. यातूनच या परिसरात आणि इतरही अनेक भागांमध्ये टँकर लॉबीचा उदय झाला, जम बसला आणि यातून एक प्रकारची दादागिरीही सुरू झाली. राजकीय नेते आणि टँकर लॉबी यांच्या संबंधांमुळे सामान्य नागरिकांना जाच सहन करावा लागला. वसई आणि विरारची तहान भागविणारा सूर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा पहिला टप्पा लवकरच पुरा होणार आहे. वसई आणि विरार परिसराला सध्या पेल्हार, उसगाव आणि सूर्या धामणी पाणीपुरवठा योजनांमधून २३० एमएलडी पाण्याचा पुरवठा होतो. तो अर्थातच अपुरा पडतो. आता नव्या योजनेमुळे मिरा-भाईंदर आणि वसई-विरार परिसराला चारशे एमएलडीहून अधिक पाणीपुरवठा होईल, असा अंदाज आहे. हे सारे प्रत्यक्षात आले तर पाण्याची टंचाई दूर होईल. मात्र, पुरेसा पाऊसच पडला नाही आणि धरणांमध्ये तो साठवला गेला नाही तर काय करणार? ठाणे महापालिका क्षेत्रातील पाण्याची टंचाई नवी नाही. आता शहरालगतच्या आदिवासी पाड्यांनाही जबरदस्त झळ पोहोचत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधकांमध्येही धाकधूक!

## सत्तासंघर्षाचा निकाल येत्या तीन-चार दिवसांत?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारचा विश्वासदर्शक ठराव, विधानसभा अध्यक्षांच्या निवडीची वैधता आणि शिंदे गटातील आमदारांची अपात्रता याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे पाच सदस्यीय घटनापीठ येत्या तीन-चार दिवसांत निर्णय देण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारचे याच आठवड्यात निश्चित होण्याची शक्यता असल्यामुळे सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधी पक्षांची धाकधूकही वाढली आहे...**



राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील तरतुदीनुसार दोनतृतीयांशहून अधिक आमदारांचा गट फुटल्यास त्यांना अन्य पक्षात विलीन होण्याचे बंधन आहे. शिंदे गट कोणत्याही पक्षात विलीन झालेला नाही, तर आपलाच गट हीच खरी शिवसेना असल्याचा दावा न्यायालयात केला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने तोच मूळ पक्ष असल्याचे मान्य करून धनुष्यबाण हे निवडणूक चिन्हही बहाल केले. त्यामुळे ठाकरे गटाने बंडखोर आमदारांवर बजावलेल्या अपात्रतेच्या याचिकांचे भवितव्य न्यायालय ठरविणार की विधानसभा अध्यक्षांकडे सुनावणीसाठी पाठविले जाणार, हा मुद्दा कायदेशीर व राजकीय दृष्टीनेही महत्त्वाचा ठरणार आहे. सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवण्यात आला आहे. न्यायमूर्ती शाह हे १५ मे रोजी निवृत्त होत असून तत्पूर्वी म्हणजे मंगळवार ते शुक्रवार या दरम्यान घटनापीठ निकाल देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शिंदे यांची विधिमंडळ गटनेतेपदावरून उद्धव ठाकरे यांनी केलेली हकालपट्टी आणि शिंदे यांनी या पदावर स्वत: ची केलेली नियुक्ती वैध आहे का, मुख्य प्रतोदपदी सुनील प्रभू की भरत गोगावले यांची नियुक्ती वैध, या मुद्द्यांवर घटनापीठ निर्णय देणार आहे. आतापर्यंत झालेल्या सुनावण्यांमध्ये अरुणाचल विधानसभा अध्यक्ष नबम रेबियाप्रकरणी प्रामुख्याने युक्तिवाद झाले. विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावाची नोटीस देण्यात आली, तर त्यावर सभागृहात निर्णय होईपर्यंत त्यांना आमदार अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देता येणार नाही, असा पाच सदस्यीय घटनापीठाचा निकाल आहे. त्याचा फेरविचार करण्यासाठी सात सदस्यीय घटनापीठाकडे हे प्रकरण पाठवावे का, या मुद्द्याचा घटनापीठ विचार करणार आहे.

विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी अपात्रतेच्या याचिकांवर संबंधित आमदारांना उत्तर सादर करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. पण शिंदे गटातील आमदारांच्या व भाजपच्या पाठिंब्यावर ॲड. राहुल नार्वेकर हे विधानसभा अध्यक्ष झाले आहेत. दहाव्या परिशिष्टानुसार आमदार अपात्रतेबाबत निर्णयाचा अधिकार अध्यक्षांना असला तरी ते याच आमदारांच्या पाठिंब्यावर निवडून आल्यामुळे नबम रेबिया प्रकरणातील तर्कानुसार त्यांनाही निर्णयाचा अधिकार उरत नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांची निवड आणि शिंदे-फडणवीस सरकारने बंडखोर आमदारांच्या पाठिंब्याने जिंकलेला विश्वासदर्शक ठराव वैध आहे की नाही, या बाबी सर्वोच्च न्यायालय तपासणार आहे.

आमदार अपात्रतेसंदर्भातील याचिका विधानसभा अध्यक्षांकडे सुनावणीसाठी पाठवायच्या असतील, तर त्याआधी त्यांची निवड वैध ठरविण्याची आवश्यकता आहे. नवब रेबियाप्रकरणी सात सदस्यीय घटनापीठाकडून फेरविचाराची गरज आहे की नाही, याबाबतही न्यायालयाकडून निर्णय अपेक्षित आहे.

### दोन शक्यतांची सत्तावर्तुळात चर्चा

**घटनापीठाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरविल्यास मुख्यमंत्र्यांना तातडीने राजीनामा द्यावा लागेल. त्यानंतर नव्याने सरकार स्थापन करण्याचे सर्व सोपस्कार पार पाडावे लागतील. आमदार अपात्रतेचा निर्णय विद्यमान विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला गेला, तर मात्र पुढील निवडणुकीपर्यंत सध्याची स्थिती कायम ठेवणे शिंदे-फडणवीस सरकारला शक्य होणार आहे.**

---

# "राज ठाकरेंना स्मृतिभ्रंश झालाय!

## शरद पवारांवरील टीकेवरून जितेंद्र आव्हाडांचं प्रत्युत्तर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची शनिवारी ( ६ मे ) रत्नागिरीत सभा पार पडली. या सभेत राज ठाकरेंनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. शरद पवारांच्या तोंडून कधीही शिवरायांचं नाव येत नाही, असं विधान राज ठाकरेंनी केलं होतं. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.**



### राज ठाकरे काय म्हणाले?

"२०१४ साली भाजपाचं सरकार राज्यात आलं. त्यापूर्वी काँग्रेस, राष्ट्रवादीचं सरकार होतं. तेव्हा कोणाच्या तरी डोक्यात खूळ आलं की, अरबी समुद्रात शिवरायांचं स्मारक बांधायचं. त्यावर मी काय बोललो? ते राहिलं बाजूला. पण, राष्ट्रवादीच्या लोकांनी पसरावयाला सुरुवात केली की, राज ठाकरे शिवरायांच्या स्मारकला विरोध करतो आहे. मी शिवरायांच्या स्मारकाला विरोध का करेन?," असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला.

"जो पक्ष, ज्या पक्षाचा अध्यक्षांनी परवा दिवशी राजीनामा दिला आणि आत्ता असलेले. या माणसाच्या तोंडून म्हणजे शरद पवारांच्या कधीही शिवरायांचं नाव येत नव्हतं. त्यांची भाषणं काढून बघा तुम्ही. शाहू, फुले आंबेडकर हीच नाव आहेत. ते तर मोठे होतेच, त्याबाबत काही वाद नाही. पण, सर्वप्रथम आमच्या शिवरायांचं नाव घेतलं पाहिजे. ती आमची ओळख आहे," असं राज ठाकरेंनी म्हटलं.

### "राज ठाकरेंना आज काय बोलले उद्या आठवत नाही"

राज ठाकरेंच्या वक्तव्यावर जितेंद्र आव्हाड यांनी भाष्य केलं आहे. "स्मृतिभ्रंश झालेला एक नेता म्हणून राज ठाकरेंना त्यांच्याकडं पाहतो. ते काल काय बोलले, त्यांना आज आठवत नाही. आज काय बोलले, उद्या आठवत नाही. पुण्यात राज ठाकरेंनी शरद पवारांना महाराष्ट्र कोणाच्या नावाखाली एकत्र येणार हा प्रश्न विचारला होता. त्यावर 'शिवाजी महाराज' हे उत्तर शरद पवारांनी दिलं होतं," असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### "...अन् शिवाजी महाराजांची बदनामी करून दिली"

"'हर हर महादेव' वेळी तुमची भूमिका बघितली आहे. 'हर हर महादेव'मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करण्यात आली. त्या चित्रपटाला राज ठाकरेंचा आवाज आहे. तुम्हाला चित्रपटात माहिती असूनही, आपण शिवाजी महाराजांची बदनामी करून दिली," असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला.

"जेव्हा आम्ही 'हर हर महादेव' विरोधात बोलत होतो, तेव्हा तुम्ही गप्प बसला होता. शिवाजी महाराजांना देव बनवू नका, हे आमचं कायमचं मत होते. तुमच्यासारखी लोक शिवाजी महाराजांना देवत्व प्राप्त करून मंदिरात बंद करू इच्छितात, पण हे होणार नाही," असा इशारा जितेंद्र आव्हाडांनी दिला आहे.

# शरद पवार पुन्हा एकदा पावसात भिजले !



।सोलापूर । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे सोलापुरात गेले असता पुन्हा एकदा पावसात भिजले. यावेळी २०१९ च्या निवडणुकीवेळी ते साताऱ्यात पावसात भिजले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे २०१९ च्या निवडणुकीदरम्यान साताऱ्यात एका प्रचारसभेत भाषण देत असताना पावसात भिजले होते. राज्यात त्याची जोरदार चर्चा रंगली होती. इतकेच नाही, तर निवडणुकीतील यशाचे श्रेय पवार यांच्या पावसात भिजण्यालाही देण्यात आले होते. आता सोलापुरात पवार पुन्हा एकदा पावसात भिजले आहेत. या निमित्ताने त्यांच्या भिजण्याची पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे.

शरद पवार हे पंढरपूर, सांगोला दौरा आटोपून सोलापुरात रविवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास दाखल झाले. सोलापूर शहराचे माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते मनोहर सपाटे यांच्या घरगुती लग्न सोहळ्यात शरद पवारांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. हा लग्न सोहळा सोलापूर शहरातील निराळे वस्ती परिसरातील शरदचंद्र पवार शाळेत आयोजित करण्यात आला होता. ज्यावेळी शरद पवार यांचे आगमन झाले त्यावेळी सोलापूर शहरात पावसाची रिपरिप सुरु होती. कार्यकर्ते शरद पवार यांच्यासाठी पावसात उभे असल्याचे पाहताच त्यांनी आपले वाहन थांबवून पावसात भिजत कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले. त्यांनी काही जणांचे निवेदने देखील स्वीकारले.

# मणिपूर जळत आहे!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींवर राहुल गांधींचा हल्लाबोल

। इम्फाळ । महाईन्यूज ।

**मणिपूरमध्ये आदिवासी आणि मैतइ सुमदायामध्ये हिंसाचार उफाळला आहे. या हिंसाचारामुळे दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे सरकारने दिले आहेत. त्यापार्श्वभूमीवर शनिवारी ( ६ मे ) पाच जणांना गोळ्या घालण्यात आल्या. त्यामुळे तेथील दंगलबळींची संख्या ५४ वर पोहोचली आहे. यावरूनच काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांना लक्ष्य केलं आहे.**



"मणिपूर जळत आहे. पण, पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शाह कर्नाटकात विधानसभेच्या प्रचारात दंग आहेत. भाजपाच्या हिंसा आणि द्वेषाच्या राजकारणामुळे मणिपूरमध्ये ही परिस्थिती उद्भवली आहे," अशी टीका राहुल गांधींनी केली आहे. ते कर्नाटकात प्रचारसभेत बोलत होते.

"भाजपा जिथे जाते, तिथे दुही निर्माण करून द्वेष पसरवण्याचं काम करते. त्यांचं काम द्वेष पसरवण्याचं असून, आमचं काम लोकांना जोडण्याचं आहे," असेही राहुल गांधींनी म्हटलं. "जेवढा द्वेष त्यांच्या मनात आहे. त्याच्या १० पटीने अधिक प्रेम आमच्या मनात आहे. द्वेषाला द्वेषाने हरवलं जाऊ शकत नाही. तर, द्वेषाला प्रेमाने हरवलं जाऊ शकते," असेही राहुल गांधींनी सांगितलं.

### मणिपूरमध्ये नेमकं काय घडलं?

» मणिपूर उच्च न्यायालयाने मैतेइ समाजातील लोकांना अनुसूचित जमातीमध्ये स्थान देण्याबाबत ४ आठवड्यात विचार करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. केंद्र सरकारलाही याबद्दल विचार करण्यासाठी शिफारस करण्याच आदेश न्यायालयाने राज्य सरकारल दिले होते. यालाच विरोध करण्यासाठी बुधवारी ( ३ मे ) ऑल ट्रायबल स्टुडंट्स युनियन मणिपूरने चुराचांदपूर जिह्याच्या तोरबंगमध्ये एका रॅलीचं आयोजन केलं होतं. 'आदिवासी एकता मार्च' नावानं असलेल्या या रॅली हजारो संख्येने लोक सहभागी झाले होते. तेव्हाच हिंसाचार सुरु झाल्याचं सांगितलं जात आहे.

## मोदी यांच्याकडे पुरावे का मागत नाही?: सिबल

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

"काँग्रेस मागच्या दाराने दहशतवादाशी संबंधित लोकांशी राजकीय वाटाघाटी करत असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला होता. त्याबद्दल निवडणूक आयोग त्यांच्याकडे पुरावे का मागत नाही?" असा सवाल राज्यसभा सदस्य कपिल सिबल यांनी आयोगाला केला.

काँग्रेसने एका जाहिरातीत भाजपविरुद्ध केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांसंदर्भात निवडणूक आयोगाकडून पुराव्यांची मागणी काँग्रेसकडे करण्यात आली. त्याचा संदर्भात सिबल यांनी ही प्रतिक्रिया दिली. वृत्तपत्रांत भाजपविरुद्ध प्रकाशित 'भ्रष्टाचाराचे दरपत्रक' या जाहिरातीसंदर्भात निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या कर्नाटक शाखेला नोटीस बजावण्यात आली आहे. या संदर्भात भाजपने आयोगाकडे तक्रार दाखल केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. दुसरीकडे एकगठ्ठा मतदानासाठी काँग्रेसने दहशतवादाला आश्रय दिला, या मोदींनी केलेल्या आरोपांवर कारवाईची मागणी शनिवारी काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहून केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केवळ 'जॅकेट' प्रसिद्ध असून हे जॅकेट ते दररोज चार वेळा बदलतात, अशा शब्दांत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी त्यांच्यावर हल्ला चढवला. रा. स्व. संघ आणि भाजप यांच्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा मुद्दा खरगे यांनी पुन्हा उपस्थित केला.

### भ्रष्टाचार, बेरोजगारी हाच खरा दहशतवाद -प्रियंका

कर्नाटकात सध्या भ्रष्टाचार, लूटमार, भाववाढ आणि बेरोजगारी हाच खरा दहशतवाद असून त्याला आळा घालण्यात सत्तारुढ भाजपला अपयश आले आहे, अशी टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी वढेरा यांनी रविवारी केली. दक्षिण कर्नाटक जिल्ह्यातील मूदबिद्री येथील जाहीर सभेत त्या बोलत होत्या. देशात कोणत्याही ठिकाणी निवडणूक असली की पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपचे अन्य नेते अतिरेकी आणि राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करतात, असे त्यांनी सांगितले. त्या म्हणाल्या की, मोदींसह हे भाजपचे नेते लोकांच्या खऱ्या प्रश्नांबाबत बोलत नाहीत. त्यांना मी सांगू इच्छिते की भाववाढ, बेरोजगारी आणि भाजप सरकारचा ४० टक्के भ्रष्टाचार हा खरा दहशतवाद आहे. भाजपकडून निवडणुकीच्या तोंडावर आश्वासने दिली जातात.

## मध्यप्रदेशातही भाजपाला मोठा धक्का!

### माजी मंत्री दीपक जोशी काँग्रेसमध्ये दाखल

। बंगळुरू । महाईन्यूज ।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीत तिकीट डावलल्यामुळे अनेक वरिष्ठ भाजपा नेत्यांनी पक्षाला रामराम ठोकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर आता मध्य प्रदेशमध्येही भाजपाचे मोठे नेते पक्ष सोडून काँग्रेसमध्ये दाखल होताना दिसत आहेत. मध्य प्रदेशमध्ये काही महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्याआधीच भाजपाचे माजी राज्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्री कैलाश जोशी यांचे सुपुत्र दीपक जोशी यांनी शनिवारी प्रदेशाध्यक्ष कमलनाथ यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**




### मुख्यमंत्री शिवराज चौहान जबाबदार


» **भाजपाचे प्रदेश सरचिटणीस रजनीश अग्रवाल म्हणाले की, दीपक हे कैलाश जोशी यांचे रक्ताचे वारसादर असतील, पण प्रदेश भाजपा हा त्यांचा वैचारीक वारसदार आहे. दीपक जोशी यांनी मात्र भाजपा सोडण्यासाठी मुख्यमंत्री शिवराज चौहान यांना जबाबदार ठरवले आहे. माझ्या पत्नीला करोना काळात वेळेवर रुग्णवाहिका न मिळू शकल्यामुळे तिचा मृत्यू झाला. शिवराज चौहान यांच्या कुचकामी प्रशासनामुळे माझ्या पत्नीचा मृत्यू झाल्याचा आरोप, दीपक जोशी यांनी केला आहे.**

माजी मुख्यमंत्री कैलाश जोशी यांच्या स्मारकाच्या उभारणीसाठी विलंब केल्यामुळे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत वाद उत्पन्न झाल्यानंतर दीपक जोशी यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री कमलनाथ यांनी स्मारकासाठी तातडीने जमीन दिली होती, असा उल्लेखही त्यांनी केला. "काँग्रेसने माझ्या वडीलांचा सन्मान राखला. मात्र भाजपाने तसे केले नाही. उलट भाजपाने त्यांचा अवमानच केला. माझ्या वडीलांच्या अवमानाचा सूड घेण्यासाठी मी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहे. मी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी सांगितले. पण स्मारकाचे काम करण्याऐवजी त्यांनी १०० कोटी रुपये खर्च करून भाजपाचे कार्यालय बांधायला घेतले आहे.", अशी प्रतिक्रिया जोशी यांनी माध्यमांना दिली.

दीपक जोशी यांचे पक्षात स्वागत करत असताना कमलनाथ म्हणाले की, आजचा दिवस हा फक्त काँग्रेससाठीच नाही तर संपूर्ण राजकारणासाठी महत्त्वाचा आहे. दीपक जोशी यांनी सत्याचा आधार घेतला. लोकशाहीचे सरंक्षण करण्याच्या लढाईत आणि मध्य प्रदेशचे जंगल राज संपविण्यासाठी जोशी यांचे स्वागत करतो. दरम्यान भाजपाने मात्र दीपक जोशी यांच्या निर्णयावर जोरदार टीका केली आहे. कैलाश जोशी हे कधीही काँग्रेसमध्ये सामील झाले नसते. काँग्रेस आणि त्यांच्यात कोणतेही साम्य नव्हते.

# कोणालाही कळू न देता मी...” अखेर सायली संजीवने उघड केलं गुपित

अभिनेत्री सायली संजीव ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे तसंच तिच्या कामामुळे प्रचंड चर्चेत आहे. लवकरच 'गोष्ट एका पैठणीची' या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ती सध्या या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करताना दिसते. या दरम्यान तिने या चित्रपटाशी निगडित तिचं एक गुपित उघड केलं आहे. सायली संजीव ही चित्रपटसृष्टीतील एक बहुआयामी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. तिने आतापर्यंत साकारलेली प्रत्येक भूमिका ही वैविध्यपूर्ण असून प्रत्येक कामात ते तिचं काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न करते. 'पैठणी' या तिच्या आगामी चित्रपटाच्या निमित्तानेही तिने अशीच एक गोष्ट केली आहे. या चित्रपटातील पात्र साकारण्यासाठी तिने कोणालाही न सांगता शिवणाचा क्लास लावला होता. आता एका मुलाखतीत तिने हे गुपित उघड केलं आहे. सायलीने सांगितलं,



"या चित्रपटात मी शिवणकाम करणारी, आजूबाजूच्या बायकांच्या साड्यांना फॉल बिडिंग करून देणारी, ब्लाऊज शिवून देणारी एका साध्या गृहिणीची भूमिका साकारत आहे. मला अभिनयाच्या जोरावर ही भूमिका नक्कीच साकारता आली असती. पण त्यात नैसर्गिकता आणण्यासाठी आणि त्या भूमिकेशी एकरूप होण्यासाठी मी दोन दिवसांचा शिवणकामाचा क्लास लावला. मी शिवणकामाचा क्लास लावला आहे ही गोष्ट मी कोणालाही सांगितली नाही."पुढे ती म्हणाली, ""गोष्ट एका पैठणीची' या चित्रपटात मी अतिशय जुन्या काळातील मशीनवर काम करतेय. त्यामुळे मला शिलाई मशीन हाताळणे, सुईमध्ये दोरा भरणे, मशीनमध्ये तेल टाकणे या सगळ्या गोष्टींची माहिती असणं गरजचं होतं. कुठेही माझा अभिनय कृत्रिम वाटू असे असं मला मनापासून वाटत होतं. म्हणूनच कोणालाही कळू न देता मी हा शिवण कामाचे प्राथमिक धडे घेतले होते."

# प्रिया बापटचा भन्नाट किस्सा

गेली काही दिवस सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमाची भलतीच चर्चा आहे. झी मराठी वाहिनीवरील 'बस बाई बस' या नव्या मालिकेत महिला कलाकार, राजकारणी सहभागी होतात यावेळी त्यांना इतर महिलांच्या मनातले प्रश्न विचारले जात आहेत. अशी भन्नाट संकल्पना असणाऱ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुबोध भावे (SUBODH BHAVE) करत आहे. या कार्यक्रमात आजवर अनेक दिग्गजांनी हजेरी लावली आहे. मराठीसह हिंदीलाही भुरळ घालणारी अभिनेत्री प्रिया बापट हिने नुकतीच या कार्यक्रमात हजेरी लावली. यावेळी तिने तिच्या नाटकाचा एक भन्नाट किस्सा सांगितला. हा किस्सा ऐकून तुम्हीही हसून वेडे व्हाल..



मालिका, चित्रपट, नाटक, वेब सिरिज अशा विविध माध्यमातून प्रेक्षकांना भुरळ घालणारी प्रिया नुकतीच बस बाई बस या शो मध्ये आली होती. यावेळी एका मजेशीर प्रश्नावर प्रियाने दिलेले उत्तर ऐकून एकाच हशा पिकला. प्रियाने बरीच वर्षे व्यावसायिक नाटकात काम केले आहे. त्याच नाटका दरम्यानचा हा किस्सा आहे. यावेळी सुबोध भावेने प्रियाला विचारले, 'कलाकार कधी वाक्य विसरतात, कधी जास्तीची वाक्य घेतात, यामुळे बऱ्याचदा नाटक लांबतं. अडीच तासाचं नाटक कधीकधी तीन तासाचं होतं.

# रश्मिका अजूनही गुंतलीय जुन्या नात्यात

रश्मिका मंदाना दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. तिच्या सिनेमांपेक्षा अधिक नेहमीच तिच्या सौंदर्याची चर्चा रंगलेली दिसून येते. लोक तिच्या एका स्माईलवर जीव ओवाळून टाकताना दिसतात. सध्या रश्मिका आपल्या नव्या बॉलीवूडच्या सिनेमामुळे चर्चेत पहायला मिळतेय.



याच सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं गेली असताना रश्मिकानं काही पर्सनल गोष्टी देखील शेअर केल्या आहेत.
ती अजूनही आपल्या एक्स बॉयफ्रेंडला भेटते,त्यासाठी काही कारणच असावं असं नाही असं सांगतानाच आमच्यात अजूनही चांगलं नातं आहे असं म्हणून गेली रश्मिका. आणि बस्स चर्चेला उधाण आलं. याचवेळी रश्मिका म्हणाली,"प्रेमाचं नातं तुटल्यानंतरही आमच्यात मैत्रीचं नातं इतकं चांगलं टिकून राहिलंय यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही".
रश्मिका लवकरच 'गूडबाय' या सिनेमातून बॉलीवूड इंडस्ट्रीत पदार्पण करतेय. रश्मिकाला या सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत विचारलं गेलं की,'जर एखाद्या पार्टीत तुला तुझा जुना बॉयफ्रेंड भेटला तर तुझी रिॲक्शन काय असेल?' तेव्हा तिनं 'नमस्ते' असं उत्तर दिलं. पुढे ती म्हणाली,"माझ्या एक्ससोबत माझी अजूनही चांगली मैत्री आहे. मी त्याच्यासोबतच त्याच्या कुटुंबियांना भेटणंही पसंत करते". एवढ्यावरच रश्मिका थांबली नाही तर तिनं हे स्विकारलं की,"खरंतर त्याचं लग्न झाल्यानंतर मी त्याला भेटणं ही चांगली गोष्ट नाही पण आमच्यात मैत्रीचं खूप चांगलं नातं आहे, पण मग हे देखील चांगलंच आहे नाही का".


# “मी मराठी असल्याचा...” अभिजीत सावंतचे स्पष्ट वक्तव्य



मोहब्बतें लुटाऊंगा हे गाणं ऐकलं तरीही आपल्या डोळ्यासमोर लोकप्रिय गायक अभिजीत सावंत हे नाव येते. या गाण्याने प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावले होते. या गाण्यामुळे प्रसिद्धीझोतात आलेला अभिजीत सावंत आजही अनेकांच्या लक्षात आहे.
अभिजीत सावंत हा इंडियन आयडल या अतिशय लोकप्रिय ठरलेल्या रिॲलिटी शोमुळे घराघरात पोहोचला. इंडियन आयडलचे पहिले पर्व गायक अभिजीत सावंतने जिंकले होते. नुकतंच त्याने त्याच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्याने मराठी संस्कृतीबद्दल थेट भाष्य केले.
छोट्या पडद्यावरील अतिशय लोकप्रिय रिॲलिटी शो म्हणजे 'इंडियन आयडल.' इंडियन आयडलचे पहिले पर्व गायक अभिजीत सावंतने जिंकले होते. ही स्पर्धा जिंकल्यानंतर त्याला अनेक गाण्यांच्या ऑफर आल्या होत्या. यामुळे त्याचे आयुष्य रातोरात बदलले होते. अभिजीत सावंतला नुकतंच मराठी संस्कृती, करिअर याबद्दल प्रश्न विचारण्यात आले. त्यावेळी त्याने त्याला याचा काय फायदा झाला आणि काय तोटा झाला याबद्दल खुलासा केला.अनेकांनी अगदी अचूक अंदाज लावला आहे.

# आमिर खान अध्यात्माच्या वाटेवर?

आमिर खान 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटातून चार वर्षांनी मोठ्या पडद्यावर परतला. त्याने चित्रपटाचे जोरदार प्रमोशन देखील केले, परंतु बहिष्कारामुळे हा चित्रपट थिएटरमध्ये चांगली कामगिरी करू शकला नाही. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर प्रेक्षकांनी चित्रपटगृहाकडे पाठ फिरवली. सलग सुपरहीट चित्रपट देणाऱ्या आमिर खानच्या या चित्रपटाने पहिल्या वीकेंडला ५० कोटींचा गल्लाही जमवता आला नाही.
यामागे बऱ्याच गोष्टी कारणीभूत आहेत, त्यापैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे 'बॉयकॉट'



ट्रेंड. आमिर खानच्या या चित्रपटाला बॉयकॉट ट्रेंडचा जबरदस्त फटका बसला. या चित्रपटाच्या अपयशानंतर लगेच आमिर खानने एका खासगी कार्यक्रमात अभिनयातून काही काळ ब्रेक घेत असल्याचे जाहीर केले होते. यानंतर आमिर खान कॅमेरासमोर फारसा आलाच नाही. आता मीडिया रीपोर्टनुसार आमिर खान या सगळ्यापासून दूर नेपाळमध्ये असल्याचं सांगितलं जात आहे.

# अखेर हैद्राबादने मारली बाजी!

## अटीतटीच्या सामन्यात, संदीप शर्माची ‘ती’ चूक राजस्थानला भोवली

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मोहम्मद आयपीएल २०२३ चा ५२ वा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात जयपूरच्या सवाई मानसिंग मैदानात रंगला. राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या राजस्थानच्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला. कमालीचा फॉर्मात असलेल्या यशस्वी जैस्वालने राजस्थानला चांगली सुरुवात करून दिली.**

### अखेरच्या चेंडूवर RR हरली

जोस बटलरच्या ९५ आणि संजू सॅमसनच्या नाबाद ६६ धावांच्या खेळींच्या जोरावर राजस्थानने २१४ धावांचा डोंगर उभारला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादची १० षटकांत १ बाद ८७ अशी दमदार स्थिती होती. हैदराबादसाठी हा करो या मरो सामना होता आणि यावेळी नशिबही त्यांच्या बाजूने होते. अखेरच्या चेंडूवर त्यांना फ्री हिट मिळाली आणि त्यांनी चार विकेट्स राखत दमदार विजय साकारला. राजस्थानने जोस बटलरच्या ९५ आणि कर्णधार सॅमसनच्या ६६ धावांच्या खेळीच्या जोरावर ६६ धावा केल्या. त्यामुळे राजस्थानला हैदराबादपुढे २१५ धावांचे आव्हान ठेवले होते. य आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादने पहिल्या १० षटकांत चांगली सुरुवात केली होती. त्यानंतर अखेरच्या षटकात दमदार फलंदाजी करत त्यांनी विजय साकारला. हैदराबादच्या २१५ धावांचा पाठलाग करत असताना हैदराबादची सुरुवात चांगली झाली नाही. कारण हैदराबादला पहिला धक्का अनमोलपप्रीतच्या रुपात बसला, त्याने २५ चेंडूंत ३३ धावा केल्या. पण त्यानंतर राहुल त्रिपाठी आणि अभिषक शर्मा यांची चांगली भागीदारी पाहायला मिळाली. त्यामुळे हैदराबादच्या संघाला पहिल्या १० षटकांमध्ये १ बाद ८७ अशी मजल मारता आली होती. अभिषेकने यावेळी अर्धशतक झळकावले.



जैस्वाल ३५ धावांवर बाद झाल्यानंतर कर्णधार संजू सॅमसन आणि जॉस बटलरने मैदानात चौफेर फटकेबाजी केली. त्यामुळे राजस्थानने २० षटकात २ विकेट्स गमावत २१४ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर विजयासाठी धावांचा पाठलाग करणाऱ्या सनरायझर्स हैद्राबादच्या फलंदाजांनी राजस्थानच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. शेवटच्या षटकात १७ धावांची आवश्यकता असताना अब्दुस समदने अप्रतिम फलंदाजी केली अन् हैद्राबादने या सामन्यात विजय संपादन केलं. संदीप शर्माने फेकलेला नो बॉल हैद्राबादच्या विजयाचा केंद्रबिंदू ठरला. शेवटच्या षटकात समदने षटकार ठोकून हैद्राबादला विजय मिळवून दिला. अमोलप्रीत सिंगने २५ चेंडूत ३३ धावांची खेळी करून सनरायझर्स हैद्राबादला चांगली सुरुवात करून दिली. परंतु, युजवेंद्र चहलच्या गोलंदाजीवर सिंग झेलबाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्माने राजस्थानच्या गोलंदाजांचा समाचार घेऊन ३४ चेंडूत २ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीनं ५५ धावा कुटल्या. मात्र, आश्विनच्या गोलंदाजीवर शर्माही अर्धशतक करून तंबूत परतला. त्यानंतर राहुल त्रिपाठीने २९ चेंडूत ४७ धावांची खेळी साकारली. तर हेनकी क्लासेनने १२ चेंडूत २६ धावा केल्या. मात्र, चहलने भेदक मारा करून दोन्ही फलंदाजांना बाद केलं आणि हैद्राबादला मोठा धक्का दिला. त्यानंतर ग्लेन फिलिफ्सने षटकार हॅट्रिक मारून ७ चेंडूत २५ धावा केल्या. फिलिप्सने हैद्राबादला विजयाच्या दिशेनं नेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर शिमरन हेटमायरने त्याचा जबरदस्त झेल घेतला.

राजस्थानसाठी सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि जॉस बटलरने धडाकेबाज फलंदाजी केली. जैस्वालने १६ चेंडूत २ षटकार आणि ५ चौकार ठोकून ३५ धावा कुटल्या. मार्को जेनसेनच्या गोलंदाजीवर जैस्वाल झेलबाद झाला. त्यानंतर बटलरने हैद्राबादच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. बटलरने ५९ चेंडूत ४ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीनं ९५ धावांची वादळी अर्धशतकी खेळी केली. भुवनेश्वर कुमारने सटीक यॉर्कर टाकून बटलरला बाद केलं आणि राजस्थानला मोठा धक्का दिला.

परंतु संजून सॅमसनने शेवटच्या षटकातही चौकार षटकारांचा पाऊस पाडला अन् राजस्थानची धावसंख्या दोनशे पार करण्यात यशस्वी ठरला. संजूने ३८ चेंडूत ५ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीनं ६६ धावांची नाबाद खेळी केली. यशस्वी जैस्वालने राजस्थानला चांगली सुरुवात करून दिली.

# हार्दिक पंड्याला पंचांचा धक्का

## धावपळीत वृद्धिमान साहाकडून घडली मोठी चूक

। अहमादाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**हार्दिक पंड्या हुशारी करायला गेला पण पंचांनी दिला मोठा धक्का दिल्याचे पाहायाल मिळाले. त्यामुळे गुजरातच्या संघात एकच धावपळ झाली आणि वृद्धिमान साहा उलटी पँट घालून यावेळी मैदानात आल्याचे पाहायला मिळाले.**



गुजरात टायटन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या आपल्या गोलंदाजीच्या सुरुवातीला एक चाल खेळायाल गेला खरा, पण त्यावेळी पंचांनी त्याला चांगलाच धक्का दिल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे गुजरातच्या संघाची चांगलीच धावपळ झाल्याचे यावेळी पाहायला मिळाले. गुजरातचा संघ गोलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यावेळी शुभमन गिल आणि वृद्धिमान साहा यांच्या जोरदार फटकेबाजीच्या जोरावर २२७ धावा केल्या. साहाने संघाला चांगली सुरुवात करून दिली होती. पण त्यानंतर मात्र साहा थोडासा थकला असावा. कारण त्याच्याबाबत हार्दिकने पहिल्याच षटकात एक मोठा निर्णय घेतला होता. पंचांनी यावेळी नियमावर बोट दाखवले आणि हार्दिकला एक मोठा धक्का दिला. त्यामुळेच गुजरातच्या संघात एकच धावपळ झाली.

### नेमकं घडलं तरी काय...

गुजरातचा संघ गोलंदाजीला उतरला. त्यावेळी साहा हा यष्टीरक्षण करण्यासाठी मैदानात आला नाही. साहाच्या जागी बदली खेळाडू म्हणून हार्दिकने यावेळी श्रीकर भरतला संघात दाखल केले. त्यामुळे भरत यावेळी साहाच्या जागी यष्टीरक्षण करण्यासाठी आला होता. सुरुवातीला कोणालाच ही गोष्ट लगेच समजली नाही. पण पंचांनी मात्र या गोष्टीला आक्षेप घेतला. पंचांनी यावेळी हार्दिकला नियम सांगितला आणि त्याला धक्का बसला. क्रिकेटचा नियम सांगतो की, पहिल्याच चेंडूपासून तुम्ही बदली खेळाडू संघात घेऊ शकत नाही. हार्दिकने सामन्याच्या सुरुवातीचा भरला मैदानात आणले होते आणि ही चूक त्याच्याकडून घडल्याचे पाहायला मिळाले.

# राशिद खानचा फक्त एक झेल ठरला सामन्याचा टर्निंग पॉईंट



। अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पांड्या ब्रदर्सच्या या आयपीएल सामन्यात ज्युनिअर पांड्याच्या संघाने शानदार विजय मिळवला. गुजरात टायटन्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्सच्या सामन्यात गुजरातच्या संघाने ५६ धावांनी शानदार विजय मिळवला. हार्दिक गुजरातचा कर्णधार तर कृणाल लखनौ संघाचा कर्णधार आहे.

या सामन्यात सुरुवातील शानदार फलंदाजी करत गुजरातच्या संघाने २२७ धावांचा डोंगर उभारला. यानुसार त्यांनी लखनौला विजयासाठी २२८ धावांचे आव्हान दिले. लखनौच्या संघाने गुजरातने दिलेल्या २२८ धावसंख्येचा लक्ष्याचा पाठलाग करताना दणक्यात सुरुवात केली. केएल राहुल दुखापतग्रस्त असल्याने आयपीएलमधून बहर झाला, त्याच्या जागी क्विंटन डी कॉकचा संघात समावेश करण्यात आला आणि सलामीसाठीदेखील तोच उतरला.